# <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५०/२०२३ मधील नि.क्र.३१ वरील आदेश</u>

प्रतिवादी क्र.२ यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.२ चे अर्जातील कथन असे आहे की, कैफियत दाखल करण्याकामी प्रतिवादींनी केलेल्या मोजणीची प्रत त्यांना वेळेत उपलब्ध झाली नसल्याने त्यांना मुदतीत कैफीयत देता आली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाला. प्रतिवादींची कैफीयत येणे आवश्यक आहे अन्यथा प्रतिवादींचे कधीही भरुन नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश रद्द होवुन त्यांची कैफीयत स्विकारण्याची त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादींचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना समन्स बजावणी होवुन देखील ते कोर्टात मुद्दाम हजर झाले नाही. दाव्याचे कामकाज लांबवण्याच्या गैरउद्देशाने उशीरा कैफीयत/म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादीच्या कृतीमुळे वादींना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे प्रतिवादीच्या अर्जावर हेवी कॉस्ट करण्यात येवुन योग्य तो हुकुम व्हावा असे म्हटले आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींकडुन अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांना दि.३०/११/२०२३ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे नि.६ वरील बेलीफ अहवालावरुन दिसते. त्यांच्या विरुध्द दि.१६/२/२०२४ रोजी एकतर्फा आदेश पारीत झाला. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ तर्फे दि.२६/६/२०२५ रोजी दाखल केला आहे. दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांना दाव्याबाबत सन २०२३ मध्ये माहीती होती. असे असताना सुध्दा त्यांनी मुदतीत हजर होवुन कैफीयत दाखल केली नाही. तरी सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीला हजर होवुन कैफीयत दाखल करण्याची संधी दिल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी याने केलेल्या

विलंबाचा विचार करता वादींना खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र. २ यांनी रक्कम रुपये रु.८००/- वादींना खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येईल.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.08.02 13:31:27 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः- ०१/०८/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पारनेर.